महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२६ वा | दिनांक : ०३/०७/२०२५ | वार : गुरूवार

# अनिल परब लिंबू मिरची घेऊन विधान परिषदेत दाखल



**मुंबई** : रायगडच्या पालकमंत्री पदाचा वादात सुरू असतानाचा शिंदे गटाचे आमदार आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्या अघोरी पूजा केल्याचा आरोप झाला होता. याचे पडसाद आज विधान परिषदेत उमटले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब हे सभागृहात चक्क 'लिंबू-मिरची' घेऊन पोहोचले. रायगडमध्ये तंत्र-मंत्राच्या माध्यमातून होणाऱ्या संभाव्य धोक्यांपासून आदिती तटकरे यांचे संरक्षण व्हावे, अशी भावना अनिल परब यांनी व्यक्त केली. त्यांच्या या कृतीमुळे सभागृहात चांगलाच हास्यकल्लोळ बघायला मिळाला.

रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. शिंदे गटाचे नेते भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे दोघेही आग्रही आहेत. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद कायम आहे. या दरम्यान काही दिवसांपूर्वी भरत गोगावले यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यातून अघोरी पूजा केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. गोगावले यांनी या आरोपांचे खंडन केले होते. मात्र, याचे पडसाद पावसाळी अधिवेशात पाहायला मिळाले. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब हे आज चक्क लिंबू-मिरची घेऊन विधान परिषदेच्या सभागृहात दाखल झाले.

आपण गेल्या महिन्यांमध्ये वेगवेगळे कायदे करुन वेगवेगळ्या पद्धतीने सुरक्षा दिली. आपण लाडक्या बहिणींना 1500 रुपये देऊन मजबूत स्थान दिले, शेतकऱ्यांना न्याय दिला, पण आज माझा विषय आहे, तुम्ही एवढ्या लाडक्या बहिणींचा मान सन्मान करताय, एवढा मानसन्मान करताना माझे देखील एक कर्तव्य आहे की, महाराष्ट्राच्या प्रत्येक बहिणीची सुरक्षा राहण्यासाठी माझे योगदान काय? हा प्रश्न माझ्यासमोर आहे. मी माझ्या बहिणीची सुरक्षा राखण्यासाठी काय करु शकतो? असा मला प्रश्न पडतो, असे अनिल परब म्हणाले.

इथे आदिती ताई तटरे बसल्या आहेत. पंकजा ताई मुंडे माझ्या बहीण आहेत. इथे बसलेल्या तुमच्या सगळ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे. सर्वोच्च स्थानी आपण बसला आहात. तुम्ही जशी नगराध्यक्षांची सुरक्षा बघताय, पण झालंय का त्या बिलात तुम्ही केवळ तेवढी काळजी घेतली आहे. पण पालकमंत्री म्हणून असे काही होणार असेल तर त्याची काळजी कोण घेणार? या तांत्रिक मांत्रिक युगामध्ये जे काही रायगड जिल्ह्यात तंत्र, मंत्र, अघोरी प्रकार जो चालला आहे, माझ्या बहिणीच्या सुरक्षेचा प्रश्न आहे, अशी उपरोधिक भावना अनिल परब यांनी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले, मला भीती वाटते, जाता-येता अपघात होऊ नये, कुठला मंत्र त्यांच्यावर येऊ नये. अघोरी प्रकार होऊ नये, म्हणून भावाचा आशीर्वाद म्हणून, मी बाकीचे काही करु शकत नाही. मी अंधश्रद्धा मानत नाही. पण हे सुरक्षा कवच माझ्या बहिणीला असावं, ते सुद्धा रायगड जिल्ह्यातला जो काही प्रकार सोशल मीडियावर बघितला, रेडे, बैल कापले गेले असतील, बळी गेले असतील, अशा बळींपासून सुरक्षा मिळावी म्हणून आपल्या मराठीत लिंबू-मिरची देतात. तसे मी ताई तुमच्या सुरक्षेसाठी एवढेच देऊ शकतो. मला अंधश्रद्धेचा प्रचार नाही करायचा. मला जे वाटते, कदाचित मी चुकीचा असेल. पण माझ्या संस्कृतीत बहिणीसाठी भावाने काहीतरी केले पाहिजे. एक दुसरा कोणीतरी ज्याच्या मनात बहिणी विषयी काही बरे-वाईट असेल, केवळ पालकमंत्री पदासाठी असेल, तर या सभागृहाचा सदस्य आणि भाऊ म्हणून माझ्या बहिणीची ईडापिडा टळावी यासाठी मी लिंबू-मिरची आणले आहेत, असे अनिल परब म्हणाले.

# शिक्षिकेकडून १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार



**मुंबई** : भारतीय संस्कृतीत गुरूला, शिक्षकांना फार महत्त्व आहे. परंतु, मुंबई येथील एका घटनेने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. शिक्षण देण्याचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षिकेचे अपवित्र कृत्य समोर आले आहे. एका नामांकित शाळेत काम करणाऱ्या शिक्षिकेने १६ वर्षीय विद्यार्थ्यावर वर्षभर लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या शिक्षिकेला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे.

या विवाहित व मुले असलेल्या या शिक्षिकेवर पोक्सो कायद्यांतर्गत तसेच बाल न्याय व भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्षभर या शिक्षिकेने १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या विद्यार्थ्याला कधी निर्जन स्थळी तसेच पंचतारांकित हॉटेलमध्ये नेत त्याच्यासोबत अश्लील चाळे करण्यात आल्याचे समोर आले आहे. यावर अद्याप शाळेकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला ही इंग्रजी विषयाची शिक्षिका असून पीडित विद्यार्थी अकरावीत असताना शिकवत होती. डिसेंबर २०२३ साली झालेल्या वार्षिक शाळेच्या कार्यक्रमासाठी नृत्य गट स्थापन करण्यात आला होता. या गटात पीडित विद्यार्थी देखील होता. याच दरम्यान शिक्षिका या विद्यार्थ्याकडे आकर्षित झाली. जानेवारी २०२४ मध्ये या शिक्षिकेने या विद्यार्थ्याला लैंगिक हावभाव देखील दाखवल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

पीडित मुलाला हे चांगले वाटले नाही म्हणून त्याने या शिक्षिकेला टाळण्यास सुरू केले. मुलगा आपल्याला टाळतोय असे लक्षात आल्यावर महिलेने तिच्या एका मैत्रिणीची मदत घेतली. या मैत्रिणीने मुलाला सांगितले की ती शिक्षिका आणि तू एकमेकांसाठी बनलेले आहात. त्यानंतर विद्यार्थ्याने शिक्षिकेला भेटण्याचा निर्णय घेतला. शिक्षिकेने या विद्यार्थ्याला एका निर्जन स्थळी नेते व तिथे त्याच्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेनंतर विद्यार्थी तणावात राहायला लागला. तणावात राहू नये म्हणून या शिक्षिकेने त्याला काही औषध देण्यासही सुरू केले, असे तपासत समोर आले.

पोलिसांच्या तपासात असे देखील समोर आले की शिक्षिका या अल्पवयीन पीडित विद्यार्थ्याला दारू देखील पाजायची. कधी दक्षिण मुंबईतील तर कधी विमानतळाजवळ असलेल्या एक पंचतारांकित हॉटेलमध्ये घेऊन जायची. तिथे त्याला जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवण्यास भाग पाडायची. हे वारंवार सुरू झाल्यानंतर पीडित विद्यार्थी हा घरात व्यवस्थित वागत नव्हता. त्याच्या वागण्यात झालेला बदल त्याच्या पालकांच्या लक्षात आला. पालकांनी त्याला विश्वासात घेत विचारपूस केली तेव्हा त्याने घडलेला सगळा प्रकार सांगितला. हे ऐकून पालकांना धक्काच बसला. बारावीचे वर्ष असल्याने त्यांनी संयमाने घेत संबंधित शिक्षिकेला तंबी दिली. बारावी झाल्यावर विद्यार्थ्याने शाळा सोडली.

विद्यार्थ्याने शाळा सोडली तरी शिक्षिकेने पुन्हा त्याच्याशी संपर्क साधला. शिक्षिकेने तिच्या घरातल्या एका कर्मचाऱ्याकडून पीडित विद्यार्थ्याशी संपर्क केला. पीडितेने शिक्षक आपल्याला पुन्हा संपर्क करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती घरी सांगितली. त्यानंतर घरच्यांनी शिक्षिकेच्या विरोधात पोलिसांत धाव घेतली. संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत पोलिसांनी पोक्सो कायद्याच्या कलम ४ (लिंगभेदक लैंगिक अत्याचार), ६ (तीव्र लैंगिक अत्याचार) आणि १७ (गुन्ह्यांचे निर्मूलन) तसेच आयपीसी आणि बाल न्याय कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांनी सुनावणी

**मुंबई** : उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या पक्ष चिन्हाच्या अधिकाराविषयी सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांनी सुनावणी होणार आहे. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी दाखल झालेल्या विशेष याचिकेच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती न देता पूर्णनिर्णयापर्यंत पक्ष चिन्हाचा तात्पुरता वापर कायम ठेवण्याचे आदेश दिले होते. आता या प्रकरणी १६ जुलै २०२५ रोजी सुनावणी होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सुनावणीकडे पाहिले जात आहे.

या प्रकरणात उद्धव ठाकरे यांच्याविरुद्ध एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह जाहीरपणे देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या १७ फेब्रुवारी २०२३ च्या निर्णयावर ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दाखल केले होते. पक्ष चिन्ह वरील निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्याच्या ठाकरे गटाच्या अर्जाला कोर्टाने आधीच नाकारले होते. वास्तविक निवडणूक आयोगाने 'बहुमत चाचणी'या निकषावरून शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्हाचे अधिकार दिले आहेत.

शिवसेना प्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील उभी फूट पडली होती. यातही अजित पवार यांना पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाले आहे. मात्र, या प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत अजित पवार गटाला पक्ष चिन्हाच्या खाली हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालू असल्याचा उल्लेख करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार अजित पवार यांच्या पक्षाच्या अधिकृत जाहिरातीमध्ये तसा उल्लेख दिसून येतो. तसाच दिलासा धनुष्यबाण या चिन्हासाठी देखील मिळावा, अशी उद्धव ठाकरे यांना अपेक्षा आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## बुलढाणा जिल्हा ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीचा एक हात मदतीचा!



**बुलढाणा (महेश मुंढे) :** भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती बुलढाणा जिल्हा कार्यकारणीच्या वतीने ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दादाभाऊ केदारे यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली दिनांक १जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा मेरा खुर्द, जि. प.पूर्व उर्दू शाळा मेरा खुर्द,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भरोसा आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामनगर येथील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ.शालिकराम चव्हाण यांच्या हस्ते शालेय साहित्य त्यामध्ये दप्तर ,लेटर पेन व इतर साहित्य याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षण विस्तार अधिकारी इंगळे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे बुलढाणा जिल्हा कार्याध्यक्ष सुनिल अंभोरे यांची उपस्थिती होती.ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती संपूर्ण देशभर ग्राहकांच्या हितासाठी काम करत आहे. त्यासोबतच समाजाला आपले काहीतरी देणे आहे याची जाणीव ठेवत समितीचे संस्थापक अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांच्या संकल्पनेतून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे सर्व पदाधिकारी राज्यातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करीत आहेत.बुलढाणा जिल्ह्यातील पदाधिकारी सचिन तरमळे जिल्हा सचिव,समाधान पाटणे सहसचिव, सुनिल जोहरे सहसचिव ,जीवन जाधव चिखली तालुका अध्यक्ष,शुभम शितोळे चिखली तालुका कार्याध्यक्ष या सर्व पदाधिकाऱ्यांनी संयुक्तिक बुलढाणा जिल्हाध्यक्ष डॉ शालिग्राम चव्हाण,विदर्भ कार्याध्यक्ष सुनिल अंभोरे,विदर्भ प्रदेश संपर्कप्रमुख डॉ.गंगाराम उबाळे, कैलास आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यामध्ये गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाची काम जोमाने करीत आहे. याच दिवशी योगायोगाने जिल्हाध्यक्ष डॉक्टर चव्हाण यांचा वाढदिवस आल्यामुळे तोही समितीच्या वतीने व शाळेच्या वतीने साजरा करण्यात आला. शाळेत साहित्य वाटप झाल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांना ग्राहक चळवळीचे त्यांच्या भाषेमध्ये त्यांना समजेल अशा भाषेमध्ये विद्यार्थ्यांना विदर्भ कार्याध्यक्ष सुनिल अंभोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षण क्षेत्रातही समितीचे योगदान पाहून शाळेचे कर्मचारी ,गावकरी व विद्यार्थी यांनी समितीचे आभार मानले. यानंतर काही दिवसात लगेचच बुलढाणा जिल्ह्यातील संपूर्ण शाळेमध्ये विद्यार्थ्यांना ग्राहक चळवळीचे धडे देण्यात येतील. या सामाजिक कार्याचे ही शिक्षक व पालक लोकांनी स्वागत केले. ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीची चळवळ ही संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात खेड्यात, शहरात व सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी असे आव्हान यावेळी विदर्भ कार्याध्यक्ष सुनिल अंभोरे, जिल्हाध्यक्ष शालीग्राम चव्हाण,सचिव तरमळे यांनी यावेळी उपस्थितांना केले.कार्यक्रमाला उपस्थित शिक्षण विस्तार अधिकारी इंगळे,केंद्र प्रमुख उकंडा बलकार, रमेश अवचार सरपंच मेरा खुर्द,गुड्डू भाऊ देशमुख उपसरपंच,गौतम गवई ग्रामपंचायत सदस्य,सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर जुबेर,संतोष बळप सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शिक्षक वृंद,पालक व विद्यार्थी हजर होते.

## कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'श्री अर्जून नेटके सरांचा सेवापूर्ती गौरव



**शिरूर (का.)** : शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'इंग्रजी विषयाचे श्री, अर्जून कोंडीराम नेटके सर,नियत वयोमानानुसार दि. ३० जून २०२५ सोमवार रोजी सेवानिवृत झाले आहेत.त्यानिमित्त प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी अर्जून नेटके सरांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा आयोजित केला होता.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब,प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य सुधाकर खोले, कोळवाडीचे सरपंच देवीस नेटके, उपसरपंच,श्री मानकर, यांच्या हस्ते लोकनेत्या स्व. केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली.प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारा बरोबरच सत्कारमूर्ती श्री,अर्जून कोंडीराम नेटके,आणि त्यांच्या पत्नी सौ.सरस्वती अर्जून नेटके,यांचा सपत्नीक कपड्यांचा आहेर आणि पुष्पहार,शा◌ॅल,श्रीफळ,हार व बुके देऊन प्राचार्य भांगे साहेबांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या ३३ वर्ष सेवेचा गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने यांनी केले.व आपल्या मनोगतातून त्यांनी कार्यक्रमाचे स्वरूप,सांगितले तर प्रमुख पाहुणे मा.सुधाकर खोले सरांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध अनुभव सविस्तरपणे सांगितले.तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य भांगे साहेबांनी अर्जून नेटके सरांच्या प्रदीर्घ सेवेचा सन्मान व गौरव करतांना सांगितले की, इंग्रजी सारखा अवघड विषय विद्यार्थ्यांना सोप्या पध्दतीने शिकविला.त्याच बरोबर संस्काराची पण धडे दिले.अशा अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या.आणि यशस्वीपणे आपली सेवा पूर्ण केली.

यानंतर ही त्यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने करून आपले जीवन सुखी, आनंदी व संपन्न करावे अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या प्रसंगी नेटके सरांच्या आई इंद्रायणीबाई,मुलगी प्रा.शारदा चव्हाण,जावई प्रा.वैभव चव्हाण, मुले महेश व तान्हाजी, व्याही भारत चव्हाण व गावातील जेष्ठ नागरिक, नातेवाईक, मित्रमंडळी यांची विशेष उपस्थिती होती.तसेच विद्यालयातील, सांस्कृतिक विभाग प्रमुख, जयेंद्र निकम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे,बाळासाहेब येवले, वसंत आहेर,राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, रविंद्र गव्हाणे,सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, तसेच उच्च माध्यमिक विभागातील परीक्षा प्रमुख प्रा. नामदेव तरकसे, प्रा. नारायण घोलप, प्रा. अशोक इनकर, प्रा. संजय आव्हाड, प्रा. अनिल जरे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा. महारूद्र डोंगरे, प्रा. बिभिषण घायाळ, प्रा. महादेव हांगे, प्रा. दत्ता गायकवाड, प्रा. लक्ष्मण गव्हाणे, प्रा.नारायण तांबे,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.दत्ता शिंदे, डॉ. सत्यनारायण ढवळे, डॉ. अशोक घोडके, प्रा. अशोक सवासे, प्रा. घनश्याम चव्हाण, प्रा. शशिकांत जावळे,प्रा.सुनिल मोरे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा. बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले, आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले,दत्ता शिंदे,श्रीमती कुसुमबाई ढिसले इत्यादिंची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ. आत्माराम झिंजुर्डे यांनी केले.यावेळी विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## आई-वडिलांनंतर सर्वात महत्त्वाचे स्थान डॉक्टरांचे सहप्रांतपाल प्रदिप मुंडे




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले सर) :** समाजातील व्यक्तींच्या जीवनात डॉक्टरांचे महत्त्व कोरोना काळात आपल्या सर्वांना माहितच आहे. खऱ्या अर्थाने रुग्णांना जीवनदान देण्याचे काम, आरोग्य सेवा आणि समर्पण ही सामाजिक बांधिलकी त्यांनी जोपासली. त्यामुळेच आई-वडिलांनंतर सर्वात महत्त्वाचे स्थान हे समाजात डॉक्टरांचे असल्याचे प्रतिपादन धाराशिव येथील सहप्रांतपाल रोटे. प्रदिप मुंडे यांनी केले. डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रोटरी क्लब मुरूम सिटी कडून आयोजित मुरूम येथील जिरोळे हॉस्पिटलच्या सभागृहात कृतज्ञता सोहळा मंगळवारी (ता. १) रोजी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे नूतन अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी होते. प्रमुख अतिथी धाराशिव येथील सहप्रांतपाल रोटे. प्रदिप मुंडे, नूतन सचिव कल्लापा पाटील, रोटरीचे माजी अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनिल राठोड, विश्वस्त रोटरी सेवा ट्रस्टचे सनिल गर्जे, इंद्रजीत आखाडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी व वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परिसरातील वैद्यकीय सेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ डॉ. राधाकिशन डागा व डॉ. शिवप्रसाद काबरा यांचा मानपत्र, भेटवस्तू, शाल व पुष्पहार घालून सहाय्यक प्रांतपाल रोटे. प्रदिप मुंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉक्टरांच्या मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. राजकुमार वाकडे यांनी केले. यावेळी डॉ. दत्तात्रय जिरोळे, डॉ. विजयानंद बिराजदार, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश स्वामी, डॉ. प्रशांत शिंदे, डॉ. महेश जिरोळे, डॉ. शिवराज हळ्ळे, डॉ. गंगासागरे, डॉ. जयेश पल्लेवाड, डॉ. सागर काबरा, डॉ. राहुल चिलोबा, डॉ. प्रिती चिलोबा, डॉ. शिल्पा डागा, डॉ. वर्षा बिराजदार, डॉ. सुनिल टिकांबरे, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. गिरीश मिनीयार, डॉ. बळवंत चव्हाण, डॉ. शिल्पा जिरोळे आदींसह महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे नूतन संचालक शिवशरण वरनाळे व बाबासाहेब पाटील यांचाही भेटवस्तू, शाल व पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राधाकिशन डागा, शिवप्रसाद काबरा, डॉ. नितीन डागा आदींनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी म्हणाले की, रोटरी ही केवळ संस्था नाही तर ही सामाजिक बांधिलकी जोपासणारी चळवळ असून रोटरीच्या कार्याची प्रशंसा केली. रोटरियन गोविंद पाटील, कलय्या स्वामी, मल्लिकार्जुन बदोले, भूषण पाताळे, पार्थ डागा आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिल राठोड यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार कल्लापा पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला रोटरीचे सर्व सदस्य व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात वृक्षारोपण




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाच्या मैदानात प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनल श्रीगीरीवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.अन्विता अग्रवाल, डॉ . प्रतिभा धोंडकर, डॉ. प्रभाकर गायकवाड, बापु गवळी, प्रा. शरद देशमुख, प्रा. निलेश भाग्यवंत, प्रा. डॉ. शोभा हनवते, प्रा. ज्योत्स्ना लचुरे प्रा जयश्री वाघमारे, शंकर विधाते तसेच पालक व विद्यार्थी यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने विविध वृक्षांची रोपांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई याप्रसंगी म्हणाल्या की, 'झाडे लावा झाडे जगवा' असा संदेश दिला. झाडे लावली तर आपल्याला पाणी बा◌ॅटल सारखं ऑक्सिजन घेऊन फिरावे लागणार नाही. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक माधुरी भावसार यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. ज्योती मंठाळकर व इको क्लबच्या प्रमुख डॉ. शीला जीरे यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थीनी, पालक उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## पुण्यात १६ वर्षीय मतिमंद मुलीवर अत्याचार



**पुणे :** खडक पोलिसांच्या हद्दीत राहणाऱ्या १६ वर्षीय मतिमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या एकाला खडक पोलिसांनी अटक केली. शाम ज्ञानोबा हातागळे (वय _५०, रा. घोरपडे पेठ,पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडित मुलीच्या आजीने खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ महिलेची १६ वर्षीय नात मतिमंद आहे ती घरासमोर खेळत होती. त्यावेळी आरोपी हातागळे त्याठिकाणी आले. त्याने मुलीला आमिष दाखवून वसाहतीतील सार्वजनिक स्वच्छतागृहात नेऊन मुलीला धमकावून त्याने तिच्याशी अश्लील कृत्य केले. या घटनेमुळे घाबरलेल्या मुलीने आजीला याबाबतची माहिती दिली. त्यानंतर आजीने पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. हातागळे याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक एस जाधव पुढील तपास करत आहेत.

## लक्ष्मण हाकेंचा मनोज जरांगेंच्या विरोधात आंदोलनाचा इशारा





**पुणे :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. तसेच हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर देखील टीका केली आहे. यापुढे ओबीसी समाज अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मतदान करणार नाही, असे विधान लक्ष्मण हाके यांनी केला आहे. ४ जुलै रोजी काही मोजक्या ओबीसी नेत्यांची बैठक देखील त्यांनी बोलावली आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले, महाराष्ट्रातल्या काही मोजक्या ओबीसीच्या नेत्यांची बैठक आम्ही मुंबई येथे ४ तारखेला बोलावली आहे आणि १५ जुलै रोजी आम्ही पुण्याच्या रस्त्यावर या महाराष्ट्रातल्या ज्या काही ओबीसी प्रवर्गात व्हीजेएनटी प्रवर्गात ज्या काही सर्व जाती येतात त्या सर्व जातींना पुण्याच्या रस्त्यावर १५ तारखेला उतरवणार आहोत.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे यांची जी काही मागणी आहे ती बेकायदा मागणी आहे. ओबीसींचे आरक्षण उद्ध्वस्त करण्याची मागणी आहे. या मागणीला आम्ही जिवाच्या शेवटच्या क्षणापर्यंत कडाडून विरोध करू. कुठल्याही परिस्थितीत आम्ही ओबीसीमध्ये मराठा समाजाच्या समावेशाला कडाडून विरोध करू.

लक्ष्मण हाके यांनी माळेगावच्या निवडणुकीवरून अजित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले, अजितदादा पवारांचा विजय हा २० हजार रुपयांपासून ते एक लाख रुपयांपर्यंत संभासदांचा रेट काढण्यात आला होता. कारण मी त्या भागात फिरतो, लोकांनी मला सांगितले कोणाच्या अकाऊंटला कसे पैसे आले, कुठून आले याच्या सगळ्या चर्चा सुरू आहेत सध्या. अजितदादा पवारांनी अर्थमंत्री पदाचा आणि उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला पाहिजे आणि माळेगावचे जे काही जबाबदारी अध्यक्षपद टाकेल आहे त्यांच्यावर ते सांभाळले पाहिजे. कारण, तिथे त्यांची गरज आहे.

## कोण भरत गोगावले? मी त्यांना ओळखत नाही : नारायण राणेंनी एका वाक्यात विषय संपवला



**मुंबई :** शिंदे गटाचे आमदार आणि मंत्री भरत गोगावले यांनी दोन-चार दिवसांपूर्वी भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याबद्दल बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावर नारायण राणे यांनी कोणतीही प्रतिक्रीया दिली नव्हती. मात्र, विधानभवनात नारायण राणे यांना याबाबत विचारले असता, त्यांनी त्या विधानाकडे लक्ष न देता एका वाक्यात उत्तर देत सगळा विषयच संपवला.

शिवसेनेचे (शिंदे गट) आमदार भरत गोगावले यांनी सिंधुदुर्गमध्ये एका भाषणात बोलताना, "राणे एवढे सहजासहजी पुढे गेले नाहीत, त्यांनी काय नाही केले? मारामाऱ्या, भानगडी, मर्डर..." असे वक्तव्य केले होते. विशेष म्हणजे त्यावेळी व्यासपीठावर नारायण राणे यांचे पुत्र व आमदार नीलेश राणे देखील उपस्थित होते. या विधानानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले. यावर नारायण राणे यांनी तत्काळ कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती. टीकेची झोड उठल्यानंतर भरत गोगावले यांनी आपल्या विधानाबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

नारायण राणे आज पावसाळी अधिवेशनासाठी विधान भवनात आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना पत्रकारांनी जेव्हा त्यांच्याकडे गोगावले यांच्या वक्तव्याबाबत विचारणा केली, तेव्हा राणे यांनी फारसे गांभीर्य न दाखवता फक्त एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. कोण भरत गोगावले? मी त्यांना ओळखत नाही. असे म्हणून ते पुढे निघून गेले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे दुसरे पुत्र आणि राज्याचे मंत्री नितेश राणे हेही होते. नारायण राणे यांनी अशा प्रकारे मुद्दा दुर्लक्षित करत एकप्रकारे तो विषय संपवून टाकला.

दरम्यान, राज्यात सध्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाच्या चर्चा सुरू आहेत. 5 जुलैला दोन्ही पक्षांचा विजय मेळावा देखील होणार आहे. यावरून देखील नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला आहे. राज ठाकरे पुन्हा उद्धव ठाकरेंसोबत जात आहेत, त्यांच्यावर विश्वास ठेवायचा का? शेवटी घर आहे, बंधुत्व आहे. कोणी कुठे जावे हा व्यक्तीगत प्रश्न आहे, असे नारायण राणे म्हणाले.

बाळासाहेबांनी 48 वर्षात जे कमावले, ते याने अडीच वर्षात साफ करुन टाकले. ओरिजन शिवसेना आता एकनाथ शिंदेंकडे आहेत. मराठी माणसासाठी, हिंदुत्वासाठी बोलण्याचा उद्धव ठाकरेंना अधिकार नाही, असे देखील राणे म्हणालेत. दोन भाऊ एकत्र येतात हा भाजपला प्रॉब्लेम आहे असे उद्धव ठाकरे म्हणतात. दोन भाऊच कशाला, सगळे भाऊ घ्या. आम्हाला फरक पडत नाही. भाजप आणि आघाडीचे तिन्ही पक्षांचे आज 235 आमदार आहेत. एवढे प्रेम उतू जातंय, तर भावाला मातोश्रीचा एक भाग देतोस का? असा सवाल नारायण राणेंनी केला.


## १२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT** — कालावधी २ वर्ष; पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर); पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY** — कालावधी १ वर्ष; पात्रता : १० वी, १२ वी पास

**C.T.SCAN** — कालावधी १ वर्ष; पात्रता : १० वी, १२ वी पास

**E.C.G.** — कालावधी १ वर्ष; पात्रता : १० वी, १२ वी पास

**O.T. TECHNICIAN** — कालावधी २ वर्ष; पात्रता : १० वी, १२ वी पास

**PG RADIOLOGY** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर); पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी** — कालावधी २ वर्ष; पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी** — कालावधी २ वर्ष; पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री** — कालावधी २ वर्ष; पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०२ जुलै २०२५


## दादा कोंडकेंसारखे उत्तर का देता? - सुधीर मुनगंटीवार यांचा सवाल



**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासात आज भाजप नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. या प्रकरणी त्यांनी नाला रुंदीकरणाच्या मुद्यावर जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिलेल्या उत्तरावर थेट विधानसभा अध्यक्षांकडे नाराजी व्यक्त केली. मंत्री दादा कोंडकेंसारखे उत्तर देत आहेत, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाची विधिमंडळ परिसरात खमंग चर्चा सुरू होती.

नाल्यांच्या योग्य नियोजनाअभावी नाल्यांशेजारी राहणाऱ्या वस्त्यांना फटका बसतो. नाल्यांची संरक्षक भिंत नियमांनुसार बांधली जात नाही. या प्रकरणी पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण झाला तर सरकार त्या अभियंत्यावर कारवाई करणार का? याशिवाय जिथे - जिथे नाले असतील त्यांच्या दुरुस्तीविषयी सरकारचे नियोजन काय? असा सवाल सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला केला. त्याला उत्तर देताना मंत्री संजय राठोड म्हणाले, सरकार अशा नाल्यांचे सर्वेक्षण करेल. नाल्यांची रुंदी तपासून ती वाढवावी लागेल का ते पाहील. भूमीअभिलेख विभागाकरवी जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चौकशी करेल. तसेच उर्वरित नाल्यांचे बांधकाम करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवू.

मंत्री संजय राठोड यांचे हे उत्तर ऐकून सुधीर मुनगंटीवार यांचे समाधान झाले नाही. ते म्हणाले, नाल्याची नैसर्गिक रुंदी जेवढी आहे तेवढीच राहिली पाहिजे. सरकार याची खबरदारी घेणार आहे का? त्यावर मंत्री राठोड केवळ सजेशन फॉर अॅक्शन (यावर विचार करू किंवा सल्ला ऐकला असून, त्यावर कार्यवाही करू) असे त्रोटक उत्तर दिले. त्यावर मुनगंटीवार यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मंत्री संजय राठोड आमचे मित्र आहेत. पण नाल्यांची नैसर्गिक रुंदी कायम राहील का? असा माझा प्रश्न होता. त्यांनी सजेशन फॉर अॅक्शन एवढेच उत्तर दिले. हे अॅक्शन, ओन्ली अॅक्शन, नो रिअॅक्शन असे असले पाहिजे. मंत्र्यांकडून अपेक्षित आहे की, नाल्याची नैसर्गिक रुंदी काय राहिली पाहिजे. त्यांच्याकडून हमी यायला हवी की नाल्याची नैसर्गिक रुंदी तशीच ठेवली जाईल. ती हमी न देता सजेशन फॉर अॅक्शन हे काय उत्तर आहे का? हे तर द्विअर्थी उत्तर झाले. हे काय दादा कोंडकेंचे उत्तर आहे का? हे द्विअर्थी आहे का? त्याऐवजी नाल्याची रुंदी निश्चित राहील याची हमी द्या.

सुधीर मुनगंटीवार यांच्या या नाराजीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मंत्री संजय राठोड यांना मुनगंटीवार यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार उपाययोजना करण्याची सूचना केली. उल्लेखनीय बाब म्हणजे सुधीर मुनगंटीवार गत काही अधिवेशनांपासून सातत्याने आपल्याच सरकारच्या मंत्र्यांना धारेवर धरत असल्याचे चित्र आहे. सध्या ते राज्य मंत्रिमंडळात समावेश न झाल्यामुळे नाराज असल्याची चर्चा आहे.

## उत्तराधिकारी बौद्ध परंपरेनुसार निवडला जाईल - दलाई लामा



**धर्मशाळा :** हिमाचलमधील धर्मशाळा येथे बुधवारपासून सुरू झालेल्या १५ व्या तिबेटी धार्मिक परिषदेच्या निमित्ताने दलाई लामा यांनी स्पष्ट केले आहे की दलाई लामांची संस्था भविष्यातही सुरू राहील. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची निवडही तिबेटी बौद्ध परंपरेनुसार केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तिबेट आणि बौद्ध धर्मात चीनचा वाढता प्रभाव पाहता, दलाई लामा यांनी देखील स्पष्टपणे सांगितले आहे की त्यांच्या उत्तराधिकारी निवडीत चीनची कोणतीही भूमिका राहणार नाही. जर चीनने तसे करण्याचा प्रयत्न केला तर ते सहन केले जाणार नाही.

धर्मशाळा येथील दलाई लामा ग्रंथालय आणि संग्रहात ३ दिवसीय धार्मिक परिषद सुरू झाली आहे, ज्यामध्ये तिबेटी बौद्ध धर्माच्या विविध परंपरांचे प्रमुख लामा, तिबेटी संसद, नागरी समाज, संघटना आणि जगभरातील तिबेटी समुदायाचे प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

१४ वे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे माहिती दिली की त्यांनी त्यांचा उत्तराधिकारी निवडण्याची जबाबदारी 'गाडेन फोडरंग ट्रस्ट'कडे सोपवली आहे. त्यांनी पुन्हा सांगितले की पुढील दलाई लामांची ओळख आणि मान्यता ही संपूर्ण प्रक्रिया केवळ ट्रस्टकडेच आहे. या प्रक्रियेत इतर कोणतीही व्यक्ती, संघटना किंवा सरकार हस्तक्षेप करू शकत नाही.

दलाई लामा म्हणाले की ट्रस्टशिवाय दुसरा कोणीही पुढील दलाई लामांची नियुक्ती करू शकत नाही. या घोषणेमुळे सध्याच्या दलाई लामांच्या निधनानंतर चीन स्वतः १५ व्या दलाई लामांची नियुक्ती करेल या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

त्यांच्या व्हिडिओ संदेशात दलाई लामा म्हणाले- १९६९ मध्येच आम्ही स्पष्ट केले होते की संस्था सुरू ठेवण्याचा निर्णय संबंधित लोकांनी घ्यावा. गेल्या १४ वर्षांत, आम्हाला जगभरातून, विशेषतः तिबेटमधून, संस्था सुरू ठेवण्यासाठी विनंत्या मिळाल्या आहेत.

त्यांनी सांगितले की, २४ सप्टेंबर २०११ रोजी त्यांनी सांगितले होते की जेव्हा ते ९० वर्षांचे होतील तेव्हा ते या विषयावर निर्णय घेतील.

सध्याचे दलाई लामा ६ जुलै रोजी ९० वर्षांचे होतील. त्यानंतर त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचा निर्णय शक्य आहे. या वर्षी मार्चमध्ये प्रकाशित झालेल्या दलाई लामा यांच्या 'व्हॉइस फॉर द डिसफंक्शनल' या पुस्तकात त्यांनी असेही लिहिले आहे की त्यांचा पुनर्जन्म चीनच्या बाहेर एका मुक्त जगात होईल, जिथे तिबेटी बौद्ध धर्म मुक्त राहील.

त्यांनी लिहिले की त्यांच्या पुनर्जन्माचा उद्देश त्यांचे कार्य पुढे नेणे आहे. म्हणूनच, नवीन दलाई लामा एका मुक्त जगात जन्माला येतील जेणेकरून ते तिबेटी बौद्ध धर्माचे नेतृत्व करू शकतील आणि तिबेटी लोकांच्या आकांक्षांचे प्रतीक बनू शकतील.

पुस्तकात केलेल्या विधानावर चीनकडून प्रतिक्रिया आली. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माओ निंग यांनी पुस्तकात दलाई लामा यांनी केलेले विधान फेटाळून लावले. त्यांनी असेही म्हटले की दलाई लामा यांना तिबेटी लोकांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार नाही.

प्रवक्त्याने सांगितले की, बुद्धांचा वंश चीनमधील तिबेटमध्ये विकसित झाला. त्यानुसार, त्यांच्या उत्तराधिकारीची निवड देखील चिनी कायदा आणि परंपरांनुसार केली जाईल. त्यांनी दावा केला की सुवर्ण कलश प्रक्रिया १७९३ मध्ये किंग राजवंशाने सुरू केली होती. त्याअंतर्गत, दलाई लामाच्या उत्तराधिकारीला मान्यता देण्याचा अधिकार फक्त चीनला आहे.

तथापि, तिबेटी समुदाय आणि दलाई लामा यांनी चीनचा दावा फेटाळून लावला. त्यांनी म्हटले की सुवर्ण कलश प्रक्रिया फक्त ११ व्या आणि १२ व्या दलाई लामांसाठी वापरली जात होती. ९ व्या, १३ व्या आणि १४ व्या दलाई लामांच्या निवडीमध्ये ती वापरली गेली नव्हती.

## वाल्मीक कराडची ऑडिओ क्लिप व्हायरल

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात तुरुंगात खडी फोडणाऱ्या वाल्मीक कराडची आणखी एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्यात तो पैसे मागणाऱ्या एका व्यक्तीला कोण रे तू कुत्रा? म्हणत जातीवाचक शिवीगाळ करताना ऐकू येत आहे. या क्लिपमुळे वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वाल्मीक कराड सध्या बीडच्या जिल्हा कारागृहात आहे. तिथे त्याच्या जीवितास धोका असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे त्याला नाशिकच्या तुरुंगात हलवण्याची चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर वाल्मीक कराडची ऑडिओ क्लिप समोर आली आहे. दिव्य मराठी या क्लिपची पुष्टी करत नाही. पण त्या क्लिपमधील आवाज हा वाल्मीक कराडचाच असल्याचा दावा केला जात आहे.

या क्लिपमध्ये वाल्मीक कराड एका व्यक्तीला पैशाच्या व्यवहारातून जातीवाचक शिवीगाळ करताना ऐकू येत आहे. आता सगळ्यांनाच मध्ये घेतो. तू कोण रे कुत्रा, अशी भाषा वापरत वाल्मीक यात समोरच्या व्यक्तीला धमकावत आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, वाल्मीकला फोन करणाऱ्या व्यक्तीने एका कामासाठी त्याला लाखो रुपये दिले होते. पण वाल्मीक कराड त्याला हे पैसे परत करत नव्हता. त्यामुळे तो फोन करून त्याला पैसे परत करण्याचा तगादा लावत होता. याचा राग येऊन वाल्मीकने सदर व्यक्तीला अर्वाच्य व जातीवाचक शिवीगाळ केल्याचे सांगण्यात येत आहे.

या कॉल रेकॉर्डिंगसंबंधी वाल्मीक कराडचे जुने सहकारी विजयसिंह (बाळा) बांगर यांनी विस्तृत माहिती दिली आहे. ते म्हणाले, एका व्यक्तीने वाल्मीक कराडला कामासाठी १० लाख रुपये दिले होते. हे पैसे परत मागण्यासाठी संबंधित व्यक्तीने वाल्मीकला फोन केला. पण त्याने त्याला पैसे देण्याऐवजी त्याला शिवीगाळ करून त्याला धमकावले. जिवाच्या भीतीने हे कुटुंब पुढे येण्यास तयार नाही. कारण, जिल्ह्यात वाल्मीकची प्रचंड दहशत आहे. पण झाला प्रकार अत्यंत धक्कादायक असल्यामुळे मी या प्रकरणी बीडच्या पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन त्यांना ही कॉल रेकॉर्डिंग देणार आहे, असे त्यांनी सांगितले. वाल्मीक कराडने संबंधित व्यक्तीला ५ रुपये देऊन खंडणीच्या गुन्ह्यात अडकवल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com